# प्रतिज्ञापत्र

**अरुण साधू यांच्या 'मुंबई दिनांक' व 'सिंहासन' या कादंबऱ्यांतील पत्रकारितेचे चित्रण** या विषयावरील प्रस्तुत लघुप्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. (मराठी) पदवी परीक्षेसाठी लिहिला आहे.

हा लघुप्रबंध अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण : कोल्हापूर

अभ्यासक

दिनांक : १९ मे, २००९

**(संतोष श्रीरंग सणस)**

**डॉ. वि. दा. वासमकर**
मराठी विभाग,
विलिंग्डन महाविद्यालय,
सांगली.

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **संतोष श्रीरंग सणस** यांनी **अरुण साधू यांच्या 'मुंबई दिनांक' व 'सिंहासन' या कादंबऱ्यांतील पत्रकारितेचे चित्रण** या विषयावरील लघुप्रबंधाचे संशोधन कार्य माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे. हा लघुप्रबंध स्वतंत्ररीत्या लिहिलेला असून यापूर्वी कोणत्याही विद्यापीठात अन्य परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

सदर लघुप्रबंध 'आधुनिक मराठी साहित्य' या अभ्यासक्षेत्रात समाविष्ट होतो.

सदर लघुप्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल (मराठी) पदवी परीक्षेसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

ठिकाण : कोल्हापूर

दिनांक : १९ मे, २००९

मार्गदर्शक

**डॉ. वि. दा. वासमकर**

# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल (मराठी) पदवी परीक्षेसाठी अरुण साधू यांच्या 'मुंबई दिनांक' व 'सिंहासन' या कादंबऱ्यातील पत्रकारितेचे चित्रण या विषयावरील लघुप्रबंध सादर करताना मला आनंद होत आहे. या निमित्ताने संशोधनाच्या प्रवासाविषयी, संशोधनाच्या कामी ज्यांचे सहकार्य व प्रेरणा लाभल्या, त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

मला लहानपणापासून कथा, कादंबरी, वैचारिक साहित्य वाचनाची आवड होती. अरुण साधू यांच्या कथा, कादंबऱ्या वाचत असताना 'मुंबई दिनांक' व 'सिंहासन' या कादंबऱ्यांनी लक्ष वेधले. मी पत्रकार असल्यामुळे या दोन्ही कादंबऱ्यातील पत्रकारितेचा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटले व तोच विषय मी डॉ. वि. दा. वासमकर यांच्या मार्गदर्शनाखाली एम. फिल पदवी परीक्षेच्या संशोधनासाठी निवडला.

डॉ. वि. दा वासमकर सरांनी वेळोवेळी मार्गदर्शन तर केलेच परंतु माझ्या वाङ्मयीन जाणीवा विकसित केल्या व अरुण साधू यांच्या 'मुंबई दिनांक' व 'सिंहासन' या कादंबऱ्यांतील पत्रकारितेचा अभ्यास करण्याची दिशा व दृष्टी दिली. या संशोधनासाठी सरांचा मोलाचा वाटा आहे. सरांच्या स्नेहपूर्ण मार्गदर्शनामुळेच मी हा लघुप्रबंध पूर्ण करू शकलो. आदरणीय मार्गदर्शक डॉ. वि. दा. वासमकर आणि त्यांचे कुटुंबीय यांचे ऋण शब्दांत व्यक्त न करता मी त्यांच्या पूर्ण ऋणातच राहणे पसंत करतो.

आदरणीय असलेले अरुण साधू यांनी मला संशोधन कार्यासाठी मदत केली व त्यांच्याशी झालेली चर्चा उपयोगी पडली. त्यांच्या ऋणातून मी मुक्त होऊ इच्छित नाही.

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग प्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. कृष्णा किरवले, डॉ. रणधीर शिंदे, प्रा. हिमांशू स्मार्त यांनी शंका समाधान करून अनमोल मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणा व प्रोत्साहन माझ्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच लिपिक शिगावकर मॅडम व कर्मचारी मिनाक्षी स्वामी यांच्या सहकार्याबद्दल आभार!

शिवाजी विद्यापीठ येथील डॉ. बाबासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे व सातारा येथील श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालयाचे ग्रंथपाल व कर्मचारी वृंद यांनी संशोधन सामग्री, आवश्यक पुस्तके वेळोवेळी आनंदाने उपलब्ध करून दिली. त्याबद्दल त्यांचेही आभार मानतो.

मी ज्या कॉलेजमध्ये पदवी शिक्षण घेतले त्या श्रीमती. मिनलबेन मेहता कॉलेज ऑफ आर्टस अॅण्ड कॉमर्स, पाचगणीचे गुरूवर्य प्रा. अशोक तवर, व एम. ए. ला किसनवीर महाविद्यालय, वाई येथे शिक्षण घेताना डॉ. पंडित टापरे, डॉ. चंद्रकांत कांबळे, डॉ. रमेश कुंभार यांनी वेळोवेळी केलेल्या सूचना व मार्गदर्शन बहुमूल्य असून या कामी उपयोगी पडले. त्यांचे मी मनापासून आभार मानतो.

वास्तविक पाहता मला कोणताही पारंपरिक शैक्षणिक वारसा लाभलेला नाही. सातवीपर्यंत शिक्षण घेतलेले माझे वडील (आप्पा) आई (आक्का) व चुलते (नाना) यांनी कार्यपूर्तीसाठी प्रतिकूल परिस्थितीत संकटाशी न घाबरता धैर्याने व चिकाटीने सामोरे जाण्याचे सामर्थ्य मला दिले. आई (आक्का) अशिक्षित पण अत्यंत प्रेमळ व मुळातच स्वाभिमानी आहे. वडिलांचे कर्तृत्व व आईचा आशिर्वाद ही माझी अक्षय प्रेरणादायी

शिदोरी आहे. या दोघांच्या अपार कष्टामुळे आम्ही भांवडे शिक्षित झालो. माझ्या प्रत्येक कार्यात रस दाखवणारे, शिक्षणासाठी सतत आर्थिक मदत करणारे माझा लहान भाऊ उमेश (तात्या), भिमराव (बापू) यांची खूप मदत झाली. माझी प्रेमस्वरूप धर्मपत्नी वैशाली व माझे आध्यात्मिक गुरू बाबासाहेब मुजावर यांनी मला या कामी वेळोवेळी प्रोत्साहन दिले त्याच्या या सहकार्याबद्दल मी ऋणी आहे.

तसेच शिवाजी विद्यापीठातील माझे जीवलग मित्र संतोष बोगांळे, संतोष काळे, सचिन अवताडे, सचिन रूपनर, सचिन धायगुडे, योगेश्वर चव्हाण या मित्रांच्या बरोबरच वैशाली जाधव या मैत्रिणीचे सहकार्य लाभले. माझ्या रामवाडी या गावातील अनिल गलगले सर यांचेही सहकार्य लाभले.

श्री. अमर शशिकांत धनवडे सर यांनी संगणक टंकलेखनासाठी घेतलेले अथक परिश्रम मी त्यांचे ऋण मानतो. लघुप्रबंधाचे काम वेळेत पूर्ण करून दिले याबद्दल मी मनपूर्वक कृतज्ञ आहे.

या सर्वांच्या सहकार्यामुळे व प्रेरणेमुळेच हा लघुप्रबंध पूर्ण होऊ शकला. या सर्वांविषयी मी अत्यंत कृतज्ञ आहे. पुन्हा एकदा या सर्वांच्या सहाकार्याबद्दल अंत:करणापासून आभार!

\- **संतोष सणस**

मातृतुल्य आक्कास...

पितृतुल्य आप्पास...

बंधू तात्या आणि बापूस...

व धर्मपत्नी वैशालीस...

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| प्रकरण पहिले | साहित्यातील वैचारिकता : पत्रकारितेचे स्वरूप | १ ते २६ |
| प्रकरण दुसरे | अरुण साधू यांची पत्रकारिता व त्यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व | २७ ते ६८ |
| प्रकरण तिसरे | 'मुंबई दिनांक' कादंबरी मधील पत्रकारितेचे चित्रण | ६९ ते १०१ |
| प्रकरण चौथे | 'सिंहासन' कादंबरी मधील पत्रकारितेचे चित्रण | १०२ ते १३६ |
| प्रकरण पाचवे | उपसंहार | १३७ ते १४२ |
| | परिशिष्ट – १. आधार ग्रंथ<br>२. संदर्भग्रंथ सूची<br>३. नियतकालिक सूची | १४३ ते १४४ |